विशेष सहाय्य योजना.

१) संजय गांधी निराधार अनुदान योजना.

२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना.

३) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना.

४) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना.

५) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना.

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : विसयो-२०१८/प्र.क्र.६२/विसयो**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: २० ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दि. २६ ऑक्टोबर,२०१०.

२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०११/प्र.क्र.१२७/विसयो-२, दि. ३१ ऑक्टोबर,२०११.

३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१२/प्र.क्र.१०२/विसयो-२, दि.०२ एप्रिल, २०१२.

४) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०११/प्र.क्र.२२६/विसयो-२, दि. १२ जून, २०१३.

५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१३/प्र.क्र.४६४/विसयो-१, दि. २७ जून, २०१३.

६) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१३/प्र.क्र.२०६/विसयो-२, दि.२१ जानेवारी, २०१४.

७) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.समिती-२०१४/प्र.क्र.१६२/विसयो-२, दि. २७ नोव्हेंबर, २०१४.

८) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१५/प्र.क्र.१०५/विसयो-२, दि.०५ मे, २०१५.

९) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१४/प्र.क्र.२६/विसयो-२, दि.२२ जून, २०१५.

१०) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१५/प्र.क्र.९४/विसयो-२, दि.०४ ऑगस्ट, २०१५.

११) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१५/प्र.क्र.२८५/विसयो-२, दि.१३ ऑक्टोबर,२०१५.

१२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१५/प्र.क्र.२७५/विसयो-२, दि.०५ जानेवारी, २०१६.

१३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१७/प्र.क्र.२०३/विसयो, दि. ०३ नोव्हेंबर, २०१८.

१४) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विसयो-२०१६/प्र.क्र.२३२/विसयो, दि.११ जून, २०१९.

**प्रस्तावना:-**

राज्यात निराधार, अंध, अपंग, शारिरीक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती व निराधार विधवा, परित्यक्त्या, देवदासी या सर्व दुर्बल घटकांसाठी अर्थसहाय्य देण्याच्या हेतूने राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व वृध्द व्यक्तींसाठी श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. तसेच केंद्र पुरस्कृत दारिद्र्य रेषेखालील वृध्द व्यक्तींकरीता इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, विधवा महिलांकरीता इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व दिव्यांग व्यक्तींसाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत मिळणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी, विविध संघटना, स्वयंसेवा संस्था व अनेक नागरिक यांच्या माध्यमातून शासनाकडे वारंवार मागणी व पाठपुरावा करण्यात येत होता. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रुपये ६००/- वरुन रुपये १०००/- व सदरहू योजनेतील विधवा लाभार्थ्यांना १ अपत्य असल्यास दरमहा रुपये ११०० व २ अपत्य असल्यास रुपये १२०० इतके अर्थसहाय्य देण्याबाबत, मा.मंत्री (वित्त) महोदयांनी सन २०१९-२० या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषणा केली आहे. त्यानुसार सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता मिळाल्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:**

विशेष सहाय्य योजना राज्यात राबविण्याबाबत गठीत संजय गांधी निराधार अनुदान समिती, समितीची कार्यकक्षा, योजनेचे निकष, लाभार्थ्यांचा पात्रतेच्या अटी व शर्ती त्याचप्रमाणे अनुदान वाटपाचे करावयाच्या कार्यवाही बाबतचे संदर्भ क्रमांक १ ते १४ येथील शासन निर्णय व परिपत्रके या शासन निर्णयाद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. तसेच विशेष सहाय्य योजना राज्यात राबविण्याकरीता करावयाच्या कार्यपध्दती/कार्यवाही या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत :-

<u>राज्य पुरस्कृत योजना :-</u>

**(१) संजय गांधी निराधार अनुदान योजना:-**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून दारिद्रय रेषेखालील यादीच्या कुटूंबात नाव नसलेल्या व रु २१०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पात्र लाभार्थ्यांस मिळणाऱ्या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** अशी करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-,** १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ५००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये ११००/-** व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना मिळणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ६००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १२००/-** अशी करण्यात येत आहे.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार व्यक्तींना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमधून रुपये ३००/- निवृत्तीवेतन देण्यात येते. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा रुपये ३००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) अशी करण्यात येत आहे.

तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १०००/-**(केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-) व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/-) अशी करण्यात येत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेच्या निकषांच्या अधीन राहून लाभ देण्यात यावा.

योजनेच्या अटी व निकष सोबतच्या परिशिष्ट-१ प्रमाणे राहतील.

**(२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनाः-**

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून दारिद्रय रेषेखालील यादीच्या कुटूंबात नाव नसलेल्या व रु २१०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पात्र लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** अशी करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-,** १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ५००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये ११००/-** व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना देण्यात येणा-या दरमहा रुपये ६००/- अर्थसहाय्यात रुपये ६००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १२००/-** अशी करण्यात येत आहे.

६५ वर्ष व ६५ वर्षावरील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार व्यक्तींना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमधून ६५ ते ७९ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना दरमहा रुपये २००/- आणि ८० वर्ष व त्यापेक्षा अधिक वयोगटातील लाभार्थ्यांना दरमहा रुपये ५००/- अर्थसहाय्य देण्यात येते. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा अनुक्रमे रुपये ४०० व रुपये १००/- अर्थसहाय्यात प्रत्येकी दरमहा रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** (६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी केंद्र शासनाचे रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-) तर (८० वर्ष व त्यापेक्षा अधिक वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ५००/-) अशी करण्यात येत आहे.

तसेच दारिद्रय रेषेखालील श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष या वयोगटासाठी रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ५००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ६००/-) व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटाकरीता रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये १०००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) अशी करण्यात येत आहे.

या योजनेच्या अटी व निकष सोबतच्या परिशिष्ट-२ प्रमाणे राहतील.

**केंद्र पुरस्कृत योजना :-**

**(३) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना:-**

या योजनेमध्ये ग्रामीण भागाकरिता ग्राम विकास भागाने दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या सर्वेक्षणानुसार व शहरी भागासाठी नगर विकास विभागाने दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या घेतलेल्या सर्वेक्षणानुसार फक्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ६५ वर्ष व ६५ वर्षावरील सर्व व्यक्ती पात्र होतील. सदर योजनेतील ६५ ते ७९ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून दरमहा रु. २००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता लाभार्थ्यांना दरमहा रुपये ५००/- अर्थसहाय्य देण्यात येते. याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून देण्यात येणा-या अनुक्रमे रु.४००/- व रुपये १००/- अर्थसहाय्यात प्रत्येकी रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम दरमहा **रुपये १०००/-** (६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी केंद्र शासनाचे रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ५००/-) अशी करण्यात येत आहे.

तसेच दारिद्रय रेषेखालील इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा**

**रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ५००/- ), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ६००/-) व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे ६५ ते ७९ वर्ष वयोगटाकरीता रुपये २००/- व राज्य शासनाचे रुपये १०००/- तर ८० वर्ष व त्यावरील वयोगटाकरीता केंद्र शासनाचे रुपये ५००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) अशी करण्यात येत आहे.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेले संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून लाभ देण्यात यावा.

त्याचप्रमाणे इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना या दोन्ही योजनेतील लाभार्थ्यांचे वय ८० वर्ष झाल्यास त्या लाभार्थ्यांना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ देण्यात यावा.

या योजनेच्या अटी व निकष सोबतच्या परिशिष्ट-३ प्रमाणे राहतील.

**(४) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना:-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ४० ते ७९ वर्ष वयोगटातील विधवा महिला, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेतंर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र आहेत. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्र शासनाकडून लाभार्थ्याला रुपये ३००/- दरमहा देण्यात येतात. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा रुपये ३००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) अशी करण्यात येत आहे.

तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना दरमहा रुपये १०००/-(केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-) व २ अपत्य ( २ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/-) अशी करण्यात येत आहे.

या योजनेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक जे - ११०१२ / १ / २००९ एनएसएपी, दि. ३०.९.२००९ नुसार राहतील. सदर अटी / शर्ती संक्षिप्तपणे सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये दर्शविल्या आहेत.

**(५) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनाः-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या अपंग लाभार्थ्यांपैकी, फक्त १८ ते ७९ वर्ष वयोगटातील व ८० टक्क्याहून जास्त अपंगत्व असलेले तसेच एक किंवा बहुअपंगत्व असलेले (दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व) लाभार्थी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमध्ये निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र राहतील. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्रशासनाकडून लाभार्थ्यांना दरमहा रुपये ३००/- अर्थसहाय्य देण्यात येते. त्याला पूरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून लाभार्थ्यांस देण्यात येणा-या दरमहा रुपये ३००/- अर्थसहाय्यात रुपये ४००/- इतकी वाढ करुन अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-) करण्यात येत आहे.

तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना दरमहा रुपये १०००/-(केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ७००/-), १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये ११००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ८००/-) व २ अपत्य ( २ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना **दरमहा रुपये १२००/-** (केंद्र शासनाचे रुपये ३००/- व राज्य शासनाचे रुपये ९००/-) अशी करण्यात येत आहे.

या योजनेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक जे - ११०१२ / १ / २००९ एनएसएपी, दि. ३०.९.२००९ नुसार राहतील. सदर अटी / शर्ती संक्षिप्तपणे सोबतच्या परिशिष्ट-५ मध्ये दर्शविल्या आहेत.

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती योजनांसाठी योजनेसाठी अर्ज करण्याची पध्दत, समितीचे गठन, कार्यपध्दती, समितीच्या बैठका परिशिष्ट-१, नमुना-दोन प्रमाणे राहील.

२. संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी "ज्या व्यक्तीचे किंवा त्या व्यक्तीच्या कुटुंबाचे उत्पन्न, स्थावर / जंगम मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न वा सज्ञान मुलाकडून व इतर व्यक्तीकडून मिळत असलेली मदत असे सर्व एकत्रित करुन त्यांचे कायमस्वरुपी चरितार्थ चालविण्याकरीता पुरेसे उत्पन्न नसल्यास अशा व्यक्तीस / कुटुंबास" निराधार समजण्यात यावे.

३. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत एका कुटुंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास लाभार्थ्यांची स्वतंत्रपणे गणना करण्यात येऊन अर्थसहाय्याचे वाटप करण्यात यावे.

४. संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची मुले २५ वर्षाची होईपर्यंत किंवा नोकरी मिळेपर्यंत (शासकीय/निमशासकीय/खाजगी) यामध्ये जे अगोदर घडेल तोपर्यंत लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा. मुलाला नोकरी मिळाल्यानंतर (शासकीय/निमशासकीय /खाजगी) मुलाचे व कुटुंबाचे उत्पन्न विचारात घेऊन लाभार्थ्यांची पात्रता ठरविण्यात यावी.

मात्र ज्या लाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील अशा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलीचे वय २५ वर्ष झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन त्या सासरी गेल्या तरीसुध्दा लाभ चालू राहील.

५. विशेष सहाय्य योजनेसाठी लाभार्थ्यांकडून जातीचे प्रमाणपत्राची सक्ती न करता विहित प्रपत्रातील स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे. सदरचे स्वयंघोषणापत्र इतर शासकीय / खाजगी कामासाठी ग्राह्य धरण्यात येऊ नये. स्वयंघोषणापत्राचा विहित प्रपत्र सोबतच्या परिशिष्ट-१ नमुना नऊ मध्ये दर्शविला आहे.

६. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनांकरीता दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. ५०,०००/- असून दिव्यांग लाभार्थी वगळून इतर सर्व लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु.२१,०००/- अशी राहील.

७. विशेष सहाय्य योजनेमधील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण दर महिन्याच्या १ तारखेलाच नियमितपणे करण्यात यावे.

८.  विशेष सहाय्य योजनेसाठी पात्र नवीन लाभार्थ्यांकरिता आधार कार्ड सक्तीचे राहील. तसेच विशेष सहाय्य योजनेमधील सध्याच्या लाभार्थ्यांचे आधार कार्ड संबंधित योजनेशी ३ महिन्याच्या आत संलग्न करण्याचे बंधनकारक राहील. नवीन पात्र लाभार्थ्यांचे आधार कार्ड योजनेशी संलग्न केल्यानंतरच तसेच सध्याच्या लाभार्थ्यांचे ३ महिन्यांनतर आधार कार्ड योजनेशी संलग्न केल्यानंतरच अर्थसहाय्याचे वाटप करण्यात यावे.

९.  सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक ०१ सप्टेंबर, २०१९ पासून करण्यात यावी.

१०.  या योजनांखालील लाभार्थ्यांची संख्या, देय अर्थसहाय्याचे व खर्चाचे मासिक अहवाल परिशिष्ट-१२, परिशिष्ट-१३, परिशिष्ट-१४, परिशिष्ट-१५ मधील नमुना - एक मध्ये तहसिलदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावेत आणि परिशिष्ट-१२, परिशिष्ट-१३, परिशिष्ट-१४, परिशिष्ट-१५ मधील नमुना - दोन, नमुना-तीन मध्ये जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी त्रैमासिक / वार्षिक अहवाल शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सध्या लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्य नियमितपणे विहित कालमर्यादेत देण्यात यावे.

११.  हा शासन निर्णय, नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११६/१४१३, दिनांक ११.०७.२०१९ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४१८/व्यय-१४, दिनांक २४.०७.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०८२११२१२४६९९२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY GIRIDHAR PATIL

Digitally signed by SANJAY GIRIDHAR PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0f7d1eee7567d430eefd928eefa78ed2a6072c4ce8f3c0aa4efaf26d9c32daeb, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=bd10fe5a55495bc381e7b4d4b658250c74eb3f55113a21fd21c8620f04c2c257, ou=SOCIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY GIRIDHAR PATIL
Date: 2019.08.21 12:28:08 +05'30'

**( सं. गि. पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत** : परिशिष्ट-१ ते परिशिष्ट-१५

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,

३) सर्व जिल्ह्यांचे पालक मंत्री,

४) सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,

५) सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,

६) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,

७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

८) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.

९) सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषि भवन, नवी दिल्ली,

१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

११) संचालक, नागरी प्रशासन, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई,

१२) वित्त विभाग (व्यय-१४ / अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई,

१३) सर्व मंत्रालयीन विभाग/सर्व विभागीय आयुक्त /सर्व महापालिका आयुक्त / सर्व पोलीस आयुक्त

१४) सर्व जिल्हाधिकारी / सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक / सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१५) संचालक ,लेखा व कोषागारे, मुंबई

१६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,

१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१८) विभागीय समाजकल्याण अधिकारी (मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर)

१९) सर्व उप विभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व तहसिलदार,

२०) सर्व कोषागार अधिकारी / सर्व उप कोषागार अधिकारी,

२१) सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी,

२२) सर्व अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,

२३) निवड नस्ती, विसयो.

## परिशिष्ट-१

नमुना- एक

## संजय गांधी निराधार अनुदान योजना

पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| २ | **वय-** ६५ वर्षापेक्षा कमी असावे. |
| ३ | **कुटुंबाचे उत्पन्न-** कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दिव्यांग लाभार्थ्यांसाठी प्रतिवर्षी रुपये ५०,०००/- तर इतर सर्व लाभार्थ्यांकरीता रुपये २१,०००/- पर्यंत . |
| ४ | **<u>आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन-</u>**<br>१) दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाच्या यादीत नांव नसलेल्या व कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२१,०००/- पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना दरमहा रु.१०००/- प्रति लाभार्थी अर्थसहाय्य मिळेल. तसेच सदर योजनेतील अपत्य नसलेल्या विधवा लाभार्थ्यांना अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये १०००/-** व १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना अर्थसहाय्याची रक्कम **दरमहा रुपये ११००/-** आणि २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना मिळणाऱ्या दरमहा **रुपये १२००/-** प्रतिलाभार्थी अर्थसहाय्य मिळेल.<br>२) दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाच्या यादीतील केंद्र शासनाकडून इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमधून दरमहा रु.३००/- अर्थसहाय्य देण्यात येते. याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या संजय गांधी निराधान अनुदान योजनेतून दरमहा रुपये ७००/- असे एकूण **दरमहा रु.१०००/-** प्रतिलाभार्थी अर्थसहाय्य मिळेल.<br>तसेच केंद्र शासनाकडून इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमधून दरमहा रु.३००/- देण्यात येते. याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेतून अपत्य नसलेल्या, १ अपत्य असलेल्या व २ अपत्य (२ व त्यापेक्षा अधिक अपत्य) असलेल्या विधवा लाभार्थ्यांना अनक्रमे दरमहा रु.७००/-, रु.८००/- व रु.९००/- असे एकूण अनुक्रमे **दरमहा रु.१०००/- रु.११००/- व रु.१२००/- प्रतिलाभार्थी** अर्थसहाय्य मिळेल. |

| | |
|---|---|
| ५ | <u>पात्रतेची अर्हता-</u><br>१) अपंगातील अस्थिव्यंग, अंध, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद इत्यादि प्रवर्गातील स्त्री व पुरुष.<br>२) क्षयरोग, पक्षाघात, प्रमस्तीष्कघात, कर्करोग, एड्स (एचआयव्ही +), कुष्ठरोग, सिकलसेल व सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दुर्धर आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे स्त्री व पुरुष.<br>३) निराधार पुरुष/महिला/तृतीयपंथी, निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रीयेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणाऱ्या किंवा या योजनेखालील विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणाऱ्या महिला, परित्यक्ता, देवदासी, अत्याचारित महिला व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला व तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कुटूंब प्रमुखाच्या पत्नीस इ.<br>४) १८ वर्षाखालील अनाथ, अपंग, सिकलसेलग्रस्त व अन्य दुर्धर आजाराने ग्रस्त मुले / मुली असतील तर त्यांना पालकांमार्फत लाभ देण्यात यावा.<br>५) ३५ वर्ष व त्यावरील अविवाहीत स्त्री जर तिला कुठलाही आधार नसेल, तर तिला लाभ देण्यात यावा. मात्र तिचा विवाह झाल्यास ती स्वत:हून लाभ बंद करण्यास अर्ज करेल, असे बंधपत्र घेण्यात यावे.<br>६) घटस्फोटीत मुस्लिम स्त्रीबाबत तिच्या सासर किंवा माहेरच्या वास्तव्याच्या परिसरातील मस्जिदमधील काझीने तहसिलदारासमोर त्या स्त्रीच्या घटस्फोटासंदर्भात तहसिदारांकडे शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील अथवा गावांमध्ये/शहरामध्ये मुस्लिम समाजासाठी धार्मिक कार्य करण्यासाठी जी रजिस्टर संस्था असेल त्या संस्थेने ठराव करुन दिल्यास त्यानंतर तिला सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.<br>(७) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न या योजनेखालील विहित उत्पन्नापेक्षा कमी असल्यास ते कुटूंब. |
| ६ | **<u>१) वयाचा दाखला-</u>** ग्रामपंचायतीच्या/नगरपालिकेच्या/महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत किंवा शाळा सोडल्याचा दाखला, किंवा शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा आधार कार्ड इ. पुरावे तपासून ग्रामीण/नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा त्यापेक्षा वरील दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला.<br>**२)** वैद्यकिय प्रमाणपत्राच्या आधारे नमूद केलेले वय व सकृतदर्शनी दिसणारे वय यामध्ये तफावत नसेल यांची दक्षता घ्यावी. त्याप्रमाणे सर्वच वयाच्या दाखल्यावर वैद्यकिय अधिकाऱ्याचे नांव, त्यांचा नोंदणी क्रमांक व या दाखल्याला कोणत्या वैद्यकिय मंडळासमोर आव्हान देता येईल याची नोंद वैद्यकिय प्रमाणपत्रात नमूद करणे आवश्यक आहे.<br>**<u>३) उत्पन्नाचा दाखला-</u>** तहसिलदार किंवा उप विभागीय अधिकारी यांनी दिलेला दाखला (अर्जदाराकडून रु.५/- च्या Court Fee Stamp वर प्राप्त झालेल्या अर्जानुसार) (अर्जाचा नमुना परिशिष्ट-१० मध्ये दिला आहे) किंवा दारिद्रयरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटूंबाचा समावेश असल्याबद्दलचा सांक्षाकित उतारा. |

| | |
|---|---|
| | **<u>४) रहिवाशी दाखला-</u>** ग्रामसेवक/तलाठी/मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल.<br>**५) अपंगाचे प्रमाणपत्र**- अस्थिव्यंग, अंध, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद यांचे अपंगत्वाबाबत अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीप्रमाणे जिल्हा शल्य चिकित्सक ( सिव्हील सर्जन ) यांचे प्रमाणपत्र.<br>**६) असमर्थतेचा / रोगाचा दाखला**-- जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हील सर्जन), शासकीय रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेला दाखला.<br>**७)** कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी किंवा शासन अनुदानित निवासगृहाचा आंतरवासी नसल्याबाबतचा दाखला-<br>८) तहसिलदार किंवा ग्रामसेवक / तलाठी यांच्या शिफारशीवरुन दिलेला दाखला व महिला व बाल कल्याण अधिकारी यांनी दिलेला दाखला.<br>**९) अनाथ असल्याचा दाखला-** ग्रामसेवक / मुख्याधिकारी / प्रभाग अधिकारी यांनी दिलेला व गटविकास अधिकारी / प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सांक्षाकित केलेला दाखला.<br>**१०)** एड्स (एचआयव्ही +) ग्रस्त व तृतीयपंथी प्रवर्गासाठी सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. |
| ८ | या योजनेखाली लाभ मिळण्यासाठी अर्जदाराच्या अपत्य संख्येची अट राहणार नाही. |
| ९ | **(अ)** अपंगातील अस्थिव्यंग, अंध, मुकबधीर, मतिमंद या सर्व प्रवर्गातील अपंगांना या योजनेचा लाभ मिळण्याकरिता त्यांचे कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न या योजनेत पात्र होण्यासाठी रुपये ५०,०००/- पर्यंत असावे.<br>**(ब)** अस्थिव्यंग, अंध, मुकबधीर, कर्णबधीर, मतिमंद यांचे अपंगत्वाबाबत अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीप्रमाणे निर्णय होईल. (किमान ४० % अपंगत्व असलेल्या व्यक्ती या योजनेखाली लाभ घेण्यास पात्र ठरतील) यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हिल सर्जन) यांचे प्रमाणपत्र बंधनकारक राहील. |
| १० | शारिरीक छळवणूक झालेल्या अथवा बलात्कार झालेल्या अत्याचारित स्त्रियांच्या बाबतीत जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हील सर्जन) व महिला व बाल विकास अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र तसेच बलात्कार संबंधात पोलीस ठाण्यामध्ये गुन्ह्याची नोंद झाल्याचे पोलीस ठाण्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. |
| ११ | **(अ)** घटस्फोट प्रक्रियेतील स्त्रिया, ज्या पती-पत्नीने कायदेशीर घटस्फोट मिळण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज केला आहे, परंतु घटस्फोट मिळण्याची अंतिम कार्यवाही झालेली नाही, अशा कालावधीत पतीपासून वेगळया राहणाऱ्या स्त्रियांनी रितसर घटस्फोट मिळण्यासाठी न्यायालयाकडे केलेल्या अर्जाची सत्य प्रत व पतीपासून वेगळी राहत असल्याबद्दलचे संबंधित गावच्या तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्तरित्या दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शहरी भागासाठी तलाठी किंवा नगरपालिका / महानगरपालिकांचे कर निरीक्षक यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| | **(ब)** घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणाऱ्या किंवा या योजनेत विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणाऱ्या महिला अनुदान मिळण्यास पात्र राहतील. घटस्फोट झाल्याबाबत न्यायालयाच्या निर्णयाची प्रत व पोटगीची रक्कम याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.<br>**(क)** परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत ज्या स्त्रीला एक वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून पतीने सोडले आहे किंवा तिला पती नांदवत नाही व त्यामुळे अशा स्त्रीला स्वतंत्रपणे किंवा नातेवाईकाकडे राहावे लागते, अशा स्त्रिया पात्र असतील. याबाबत तलाठी व ग्रामसेवक यांचा संयुक्त दाखला आवश्यक राहील.<br>शहरी भागामध्ये तलाठी वा नगरपालिका / महानगरपालिकांचे कर निरीक्षक यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील. |
| १२ | वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या स्त्रियांच्या बाबतीत, महिला व बालविकास अधिकाऱ्यांचे अशा महिलेला वेश्या व्यवसायातून मुक्त केल्याचे प्रमाणपत्र व तिला शासनाच्या अन्य योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ मिळत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| १३ | अनाथ मुले-मुली म्हणजे आई-वडील मृत्यूमुखी पडल्यामुळे अनाथ झालेली व कोणत्याही शासकीय/निमशासकीय/शासन अनुदानित अनाथ आश्रमात न राहाणारे मुले-मुली यांना लाभ मिळेल. आई-वडील मृत्यूमुखी पडल्यामुळे अनाथ असल्याबद्दल तलाठी व ग्रामसेवक यांचे व संबंधित महिला व बाल विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अनाथ मुले / मुलींना देय असलेले अर्थसहाय्य हे लाभार्थी सज्ञान होईपर्यंत त्यांच्या संबंधित पालकांना देण्यात येईल. |
| १४ | विधवा ज्या स्त्रीच्या पतीचे निधन झाले आहे अशी स्त्री या योजनेखाली लाभ मिळण्यास पात्र राहील. पतीचे निधन झाल्याबद्दल संबंधित ग्रामपंचायत/ नगरपरिषद/महानगरपालिकेच्या मृत्यू नोंदवहीतील उतारा सादर करणे आवश्यक राहील. |
| १५ | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती संजय गांधी निराधार अनुदान योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| १६ | संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षांचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल. |
| १७ | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |

***********************

## परिशिष्ट-१

## नमुना- दोन

अर्ज मंजूर करण्याची पध्दत.

**संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना.**

(१) **अर्ज करण्याची पध्दत :**

(अ) अर्जदार या शासन निर्णयानुसार आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी निर्धारित केलेल्या, परिशिष्ट-१ मधील नमुना तीन मधील अर्जाच्या दोन प्रतीमध्ये, तो रहात असलेल्या भागातील संबंधित तलाठयाकडे अर्ज करील.

(ब) अशा अर्जासोबत लाभार्थ्यांच्या पात्रतेच्या अटींच्या पुष्ठ्यर्थ संबंधित कागदपत्रे व प्रमाणपत्रे जोडण्यात यावीत. नमूद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अशा प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या दोन प्रती अर्जदाराने मिळावाव्यात.

(क) तलाठी यांनी त्यांच्याकडे प्राप्त अर्जाची तपासणी करुन अर्जासोबत जी कागदपत्रे जोडण्यात आली आहेत, त्यांची व अर्ज कोणत्या योजनेसाठी दिलेला आहे, याची सविस्तर नोंद नोंदवहीमध्ये घ्यावी व अर्जदाराला विहित नमुन्यात पोच पावती द्यावी. तलाठी यांनी नोंदवही ठेवणे व त्यामध्ये अर्जाची नोंद ठेवणे बंधनकारक राहील.

(ड) तलाठी यांनी प्राप्त अर्जाची व त्यासोबतच्या कागदपत्राची छाननी व पडताळणी करुन अर्ज संबंधित तहसिलदार / नायब तहसिलदार यांचेकडे पाठवावेत.

(२) **तहसिलदार / नायब तहसिलदार यांच्याकडे आलेल्या अर्जाची छाननी** :

(अ) संबंधित तहसिलदार /नायब तहसिलदार यांच्याकडे आलेले अर्ज, प्राप्त तारखेनुसार लावण्यात येतील व त्यांना नोंदणी क्रमांक देऊन एका स्वतंत्र नोंदवहीमध्ये त्याची नोंद घेण्यात येईल.

(ब) आलेल्या अर्जाची छाननी व प्रत्यक्ष पडताळणी संबंधित तहसिलदार /नायब तहसिलदार यांनी करावी व समितीचे सदस्य सचिव म्हणून तहसिलदार यांनी अर्जदारांची यादी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीसमोर प्रत्येक महिन्यास निर्णयासाठी ठेवावी.

(क) प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी समितीने करावी व छाननीनंतर लाभार्थ्यांची निवड समितीने करावी. अशी निवड झाल्यानंतर पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी सूचना फलकावर लावण्यात यावी.

(ड) अर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना कळवावे आणि ज्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आलेले आहेत त्यांनाही कारणासह कळवावे.

(इ) अर्जांच्या छाननीमध्ये सदस्य सचिवांनी नामंजूर करण्याचे प्रस्तावित केलेले, पण समितीने पात्र ठरविलेल्या अर्जांबाबत उप विभागीय अधिकारी (महसूल) पुनर्विलोकन करुन निर्णय घेतील.

(ई) लाभार्थ्यांची यादी ग्रामसभा / प्रभाग सभेला माहितीसाठी पाठवावी. सदर पात्र तसेच अपात्र अर्जदारांची यादी ग्रामपंचायतीच्या व प्रभाग कार्यालयाच्या सुचना फलकावर लावावी. सदर यादीचे वाचन ग्राम सभेत व प्रभाग कार्यालयात करावे. ग्रामसभेने / प्रभाग कार्यालयाने काही व्यक्तींची चुकीची निवड झाली आहे, असे पुराव्यासह कळविल्यास अशा अर्जाची पडताळणी करुन समितीसमोर फेरविचारार्थ ठेवावेत.

(फ) केंद्र शासनाच्या निकषानुसार वर्षातून दोनदा ग्रामसभेच्या स्तरावर अपात्र लाभार्थी शोध मोहिम घ्यावी.

(३) **आर्थिक सहाय्य मंजूर करणे व तिचे वितरण :**

या शासन निर्णयानुसार द्यावयाचे आर्थिक सहाय्य संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीमार्फत मंजूर केले जाईल. नव्याने मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणातील लाभार्थ्यांची माहिती दर महिन्यास शासनाला कळविण्यात यावी.

**(४) संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची रचना :-**

| अ.क्र. | तपशील | पद |
|---|---|---|
| १. | मा.पालकमंत्री यांनी शिफारस केलेली संबंधित तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्ती. | अध्यक्ष |
| २. | मागासवर्गीय (अ.जा./अ.ज.) अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य |
| ३. | महिला अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य |
| ४. | इतर मागासवर्गीय / वि.जा.भ.ज. प्रवर्गातील अशासकीय प्रतिनिधी (दोन), | सदस्य |
| ५. | सर्वसाधारण प्रवर्गातील अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य |
| ६. | अपंग प्रर्वगातील अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य |
| ७. | संबंधित तालुक्यातील शासन नोंदणीकृत स्वंयसेवी संस्थेचा अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य |
| ८. | संबंधित तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्ती, अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य |
| ९. | संबंधित तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक, अशासकीय प्रतिनिधी (एक) | सदस्य |
| १०. | पंचायत समितीचे गटविकास अधिकारी / मुख्य अधिकारी, नगरपालिका / प्रभाग अधिकारी, महानगरपालिका (शासकीय प्रतिनिधी) | सदस्य |
| ११. | तहसिलदार / नायब तहसिलदार (शासकीय प्रतिनिधी) | सदस्य सचिव |

वरीलप्रमाणे संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची रचना केल्यानंतर या समितीची संख्या १२ (शासकीय व अशासकीय अध्यक्ष व सदस्यासह) इतकी राहील. सदर समितीतील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या संबंधित जिल्हयाचे मा.पालकमंत्री महोदयांच्या शिफारशीनुसार करावयाच्या आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री, अध्यक्ष तसेच अशासकीय सदस्य यांच्या नावाची शिफारस जिल्हाधिकारी यांच्याकडे करतील व त्याप्रमाणे जिल्हाधिकारी तसे आदेश निर्गमित करतील.

या समितीमधील काही सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या बाकी असल्यास किंवा अध्यक्ष / सदस्य यांच्या मृत्यूमुळे ते पद रिक्त झाल्यास, पालक मंत्र्यांच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी त्या पदांवरील नियुक्त्याबाबतचे आदेश निर्गमित करतील.

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना या योजनेमधील अर्ज तहसिलदार यांनी छाननी / पडताळणी करावी. त्यानंतर सदर अर्ज संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीसमोर मंजूरीकरीता ठेवण्यात यावेत. संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने मंजूरी दिलेल्या सर्व लाभार्थ्यांच्या यादीचे, त्या-त्या गावातील ग्राम सभेसमोर वाचन करण्यात यावे.

एखाद्या समितीमधील अध्यक्ष किंवा सदस्य यांना कमी करणे किंवा त्याऐवजी अन्य व्यक्तीस अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नेमण्यास, पालकमंत्री यांनी जिल्हाधिका-यांकडे शिफारस केली तर जिल्हाधिकारी, शासनाची पूर्व मान्यता घेऊन सुधारित आदेश निर्गमित करतील. **अशी पूर्वमान्यता न घेतल्यास ती अनियमितता समजली जाईल.**

तसेच एखाद्या समितीने (अध्यक्ष / सदस्य) गैरव्यवहार केल्यास, लाभार्थी अपात्र आढळून आल्यास संबंधित जिल्हाधिकारी यांनी सदर समिती (अध्यक्ष / सदस्य) खारीज / रद्द करतांना शासनाची पूर्वमान्यता घेऊन आदेश निर्गमित करतील.

विशेष सहाय्य कार्यक्रमांतील विविध योजनेतील अर्जदारांचे अर्ज मंजूर करताना गैरव्यवहार झाल्यास लाभार्थी अपात्र आढळून आल्यास संबंधित जिल्हाधिकारी यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष व

अशासकीय सदस्य यांचेवर देखील शासकीय सदस्याप्रमाणे जबाबदारी निश्चित करावी व त्वरीत तपास करुन दोर्षीवर गुन्हे दाखल करावेत.

वरील समितीमधील अध्यक्षांसह इतर अशासकीय प्रतिनिधींच्या नावांची शिफारस जिल्हयाचे पालकमंत्री संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे करतील. त्यानुसार जिल्हाधिकारी समिती गठणाचे आदेश तात्काळ काढतील. अशा पध्दतीने समिती गठीत होईपर्यंतच्या कालावधीत तसेच जिल्हयाचे पालकमंत्री यांनी अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांची नावे संबंधित जिल्हाधिकाऱ्याना दिली नाहीत अशा प्रसंगी जिल्हाधिकारी संबंधित तालुक्याचे तहसिलदार (सं.गां.यो.) यांच्या अध्यक्षतेखालील समितीव्दारे अर्ज मंजूरीबाबत पुढील कार्यवाही करतील. संबंधित तहसिलदार (सं.गां.यो.) यांनी लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती सर्व चौकशी करुन योजनेच्या निकषांच्या अधीन राहून एका महिन्याच्या कालावधीत सर्व अर्ज निकाली काढावेत.

समितीमध्ये लाभार्थी निवडीसंदर्भात काही मतभेद निर्माण झाल्यास समितीच्या सदस्य सचिवांनी म्हणजेच तहसिलदार यांनी अशी प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्याकडे १५ दिवसाचे आत सादर करावी. अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी ३० दिवसांच्या आत निर्णय द्यावा. जिल्हाधिकारी यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या कामकाजात अधिक पारदर्शता यावी म्हणून अशा बैठकाचे व्हिडीओ शुटींग करण्यात यावे. पूर्ण बैठकीचे व्हिडीओ शुटींग झाल्यानंतर ही मेमरी व्हिडीओ क्लिप संगणकावर जतन करावी. यामुळे प्रत्यक्ष सभेचे कामकाज कसे झाले, चर्चेत कोणते मुद्दे उपस्थित झाले याबाबत वरीष्ठ कार्यालयांना अभ्यासता येईल.

**(५) <u>समितीच्या बैठका :</u>**

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची बैठक दर महिन्याला एकदा घेण्यात यावी. समितीच्या सदस्य सचिवांनी म्हणजे तहसिलदार यांनी अध्यक्षांची तारीख घेऊन बैठकीची सूचना समितीचे अध्यक्ष व संबंधितांना पाठवावी. समितीच्या बैठकीसाठी ५० % उपस्थिती असल्यास, बैठक घेण्यात यावी. ५०% उपस्थिती नसल्यास बैठकीच्या वेळेनंतर एक तासाने समितीची बैठक सुरु करावी.

**(६)** संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची बैठक दर महिन्याला एकदा झाली नाही तर समितीच्या सदस्य सचिव यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :

अ) तहसिलदार (सं.गां.यो.) हे समितीचे अध्यक्ष यांचेशी संपर्क साधून बैठकीसाठी त्यांचेकडून दिनांक व वेळ मागून घेतील.

आ) समितीचे अध्यक्ष यांनी वेळ दिल्यानंतर त्याप्रमाणे बैठक घेण्यात येईल.

इ) तहसिलदार हे तीन दिवसांच्या आत बैठकीची सूचना अध्यक्ष आणि इतर संबंधितांना पाठवतील.

ई) समितीच्या अध्यक्षांकडून कोणताही प्रतिसाद न मिळल्यास तहसिलदार हे बैठक आयोजित करुन बैठकीचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करतील.

उ) जर बैठकीसाठी समितीचे अध्यक्ष त्या दिनांकास घेतल्या जाणाऱ्या बैठकीस उपस्थित राहिल्यास सदर बैठक त्यांचे अध्यक्षतेखाली होईल. तथापि, सदर बैठकीस समितीचे अध्यक्ष उपस्थित राहीले नाहीत तर सदर बैठक तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी.

ऊ) कोणत्याही परिस्थितीत समितीची बैठक दर महिन्यांतून किमान एकदा निश्चितपणे होईल, याची दक्षता तहसिलदार यांनी घ्यावी.

**(७) <u>लाभार्थींच्या याद्या</u> :**

(अ) लाभार्थ्यांच्या याद्या तयार करुन अशा याद्या प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये / नगरपालिकेमध्ये / महानगरपालिका प्रभाग कार्यालयात जनतेच्या माहितीसाठी लावण्यात याव्यात. अशा याद्यांची एक अद्ययावत प्रत ग्रामपंचायत / नगरपरिषद / महानगरपालिका प्रभाग कार्यालयात जनतेच्या तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. जिल्हयातील सर्व योजनांच्या योजनानिहाय लाभार्थी याद्या संगणकीकृत करुन ठेवाव्यात. लाभार्थ्यांच्या याद्या लावणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सक्तीचे आहे, याची जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

(ब) जिल्हाधिकारी यांनी लाभार्थ्यांच्या याद्या वेबसाईटवर टाकून त्या वेळोवेळी अद्ययावत कराव्यात.

**********************

## परिशिष्ट-१
## नमुना- तीन

(संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अंपग निवृत्तीवेतन योजनेखाली अर्थसहाय्यासाठी करावयाच्या अर्जाचा, अर्ज तपासणीचा व मंजूरीचा नमुना)

प्रति,

तहसिलदार,
तालुका-
जिल्हा-

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :

२. पत्ता :

३. जन्मतारीख व वय :

४. महाराष्ट्रातील अधिवास :

५. अर्जदाराचा आधार कार्ड क्रमांक :

(सोबत आधार कार्डची प्रत जोडावी.)

६. कुटुंबातील व्यक्तींची संख्या :

७. कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न :

८. जातीचा प्रवर्ग (पोट जात नमूद करावी)

अ) खुला :

ब) अनुसूचित जाती :

क) अनुसूचित जमाती :

ड) विमुक्त जाती :

इ) भटक्या जमाती :

ई) विशेष मागास प्रवर्ग :

उ) इतर मागास वर्ग :

९. निराधाराचा प्रवर्ग

**अ) वृध्द**

**ब) अपंग**

i. अंध :

ii. अस्थिव्यंग :

iii. मुकबधिर :

iv. कर्णबधिर :

v. मतिमंद :

**ब) आजार**

i. क्षयरोग :

ii. पक्षघात :

iii. प्रमस्तीष्कघात :

iv. कर्करोग :

v. एडस् (एच.आय.व्ही. +) :

vi. कुष्ठरोग :

vii. सिकलसेल आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेले दुर्धर आजार :

**क) महिलांचे प्रवर्ग**

i. निराधार महिला

ii. घटस्फोट प्रक्रियेतील महिला

iii. घटस्फोट झालेली परंतु पोटगी न मिळणारी महिला:

iv. घटस्फोट झालेली परंतु योजनेत विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणारी महिला :

v. अत्याचारित महिला :

vi. वेश्या व्यवसायातून मुक्त केलेली महिला:

vii. परित्यक्त्या महिला :

**ड)** आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे कुटूंब :
(या योजनेच्या विहित उत्पन्न मर्यादेनुसार सदर कुटुंब पात्र असणे आवश्यक)

**इ)** अनाथ मुले :
(i) मुलगा
(ii) मुलगी

**ई)** तृतीयपंथी :

१०. मी असे जाहीर करतो / करते की, मी वर दिलेली माहिती सत्य व बिनचूक असून, मी शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमीत मासिक आर्थिक लाभ घेत नाही. सदरची माहिती चुकीची आढळल्यास माझ्या विरुध्द फौजदारी कारवाईसह इतर कारवाई करण्यास मी पात्र असल्याची मला जाणीव आहे.

स्थळ:-
दिनांक-
उजव्या किंवा डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा. **अर्जदाराची सही**
टिप:- अर्जदाराने सही व अंगठयाचा ठसा बंधनकारक आहे.

११. माझ्या समक्ष श्री./श्रीमती .................................. हयाने / हिने सही व अंगठयाचा ठसा दिलेला आहे.

साक्षीदाराचे नांव व पत्ता:-

साक्षीदाराची सही.
(दिनांकासह)

१२. मी आवश्यक त्या चौकशीनंतर प्रमाणित करतो की, वरील माहिती बरोबर आहे / वरील माहिती चुकीची असल्याने प्रस्तुत योजनेत लाभ मिळावा यासाठी या अर्जाची शिफारस करीत आहे / नाही.

स्थळ:
दिनांक:

तपासणी करणाऱ्याची सही व शिक्का.

१३. असे प्रमाणित करण्यात येते की, मी प्रस्तुत अर्जाची छाननी केली आहे व अर्जामध्ये सादर केलेल्या माहितीची पडताळणी करुन घेतली आहे.

मी संजय गांधी निराधार अनुदान योजना / श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत लाभ मंजूर करण्यासाठी या अर्जाची शिफारस संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीकडे करीत आहे / नाही.

स्थळ::

दिनांक:

तहसिलदाराची सही व शिक्का.

१४. <u>समितीचे अभिप्राय</u>

अ) मान्य :

ब) अमान्य :

<u>संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या सदस्यांची स्वाक्षरी</u>

१) अध्यक्ष :

२) सदस्य :

३) सदस्य :

४) सदस्य :

५) सदस्य :

६) सदस्य :

७) सदस्य :

८) सदस्य :

९) सदस्य :

१०) सदस्य :

११) शासकीय सदस्य:

१२) शासकीय सदस्य:

**********************

## परिशिष्ट-१

## नमुना- चार

संजय गांधी निराधार अनुदान योजना / श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना या योजनेतंर्गत लाभ मंजूरीचे आदेश.

आदेश क्रमांक व दिनांक:

कार्यालयाचा पूर्ण पत्ता :

